म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय वा.वा.
दा.क्र. 9279



# कांहींतरी नवेंच करा!

BVBK-0401238
BVBK-0401238

# दानशूर कुबेर



माणसानें गरीब असणें हा जसा गुन्हा नाहीं, तसाच एखाद्याला अपार संपत्ति लाभणें हाहि कांहीं त्याचा अपराध नाहीं. पैशाच्या गरिबींतहि मनानें [खूप श्रीमंत असलेलीं माणसें आपण पहातों; तशींच धनानें खूप संपन्न असलेल्या माणसांचीं हृदयें थोर सद्‌गुणांनीं कधींच समृद्ध नसतील असें म्हणणें धाष्टर्याचें होईल. अमेरिकेंतील सर्वांत मोठा धनाढ्य, श्रीमंत माणूस म्हणून जॉन डी. रॉकफेलरकडे जसें बोट दाखविलें जातें, तसेंच जगांतील सर्वांत मोठा दानशूर म्हणूनहि त्याचें नांव उच्चारलें जातें. अशा त्या दानशूर कुबेराचें हें लहानसें चारित्र.

श्री : २०२ :
२-[ १-६४ ]

© : १९६०
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा अण्ड कंपनी
पब्लि.प्रा.लि.करितां
३, राउंड बिल्डिंग
काळबादेवी, मुंबई २.

*

आवृत्ति दुसरी
१९६४

*

मूल्य ५० नये पैसे

*

मुद्रक :
गं. शं. दाते
कलागृह छापखाना,
६६६ सदाशिव पेठ,
पुणें—२.

१२७१ दि० २०।५।८१
वा-वा.
BVBK-0401238
BVBK-0401238

# दानशूर कुबेर : जॉन डी. रॉकफेलर

न्ययॉर्क जगांतील एक अतिप्रचंड शहर! विशाल अमेरिकेच्या विराट वैभवाचा मानबिंदु! त्या ख्यातनाम शहराच्या मध्यवस्तींत कांहीं भव्य इमारतींचा विस्तार आहे. 'रॉकफेलर सेंटर' या नांवानें ती भव्य वास्तु जगांत प्रसिद्ध आहे.

रॉकफेलर सेंटरच्या चौदा अजस्त्र इमारतीचें बांधकाम अत्यंत अद्‍भुत, अतिसुंदर, कौशल्यपूर्ण आणि नयनमनोहर आहे. अनेक प्रकारच्या कामकाजांचें, लाखों लोकांच्या दैनंदिन व्यवहारांचें आणि असंख्य माणसांच्या वर्दळीचें हें केंद्र बनलें आहे.

उत्तुंग गगनभेदी इमारतींच्या या भव्य वास्तुसमूहांतील नाट्यगृहें, कलाप्रदर्शनें, स्टुडिओज, बगीचे, कार्यालयें वगैरे विभागांतील विजेच्या पाळण्यांची एकूण लांबी दहा मैलांवर भरेल इतका मोठा विस्तार आहे त्यांचा.

रॉकफेलर सेंटरच्या भव्य आणि दिव्य वास्तुदर्शनानें जगांतील असंख्य प्रवाश्यांचे डोळे धन्य झाले आहेत! रॉकफेलरच्या अलौकिक गुण तेजाचें, उदार दातृत्वाचें आणि विशाल व्यक्तिमत्वाचें दर्शनहि त्यांना यांतून सहजच घडलें.

इ. स. १९३० मध्यें जागतिक आर्थिक मंदीच्या लाटेंत अमेरिकेंतहि हजारों लोक बेकार झाले. त्यांना भाकरी मिळावी म्हणून दयाळू रॉकफेलरनें या वास्तूंची योजना केली आणि सुमारें एक कोटि डॉलर्स खर्चून या इमारती बांधून काढल्या. या बांधकामासाठीं जगांतील नामांकित कारागिरांबरोबर पंचवीस हजार कामगार सतत नऊ वर्षे खपत होते.

संपत्ति ही साधारणतः माणसाच्या खऱ्या विकासाला विरोध करते, माणसाची शक्ति शोषते आणि त्याच्या आयुष्याचा नाश करते असा समज होऊन बसला आहे. परंतु दौलतीच्या दडपणाखालीं दबून न जातां, खोटी प्रतिष्ठा देणाऱ्या स्वार्थी स्नेह्यांच्या आणि खुशामती गोडबोल्यांच्या मायाजाळांत न गुरफटतां आणि केवळ

चैनीचें हेतुशून्य जिणें जगून आत्मनाश करून न घेतां संपत्तीच्या साधनानें मनुष्याला मानवतेच्या सद्‌गुणांचा तोल सांभाळतां येतो, प्राप्त संपत्तीच्या सदुपयोगामुळें आत्म-विकासाबरोबरच महान् कार्यं करून जगत्कल्याण साधतां येतें, आणि संपत्तीच्या दानामुळें विश्वाला नवजीवन देऊन आपल्या आयुष्याचें खरें सार्थक करतां येतें हें रॉकफेलरनें सिद्ध करून ठेविलें आहे.

"दान हें आरोग्यवान आयुष्याचें रहस्य आहे. हें दान केवळ पैशांचेंच असतें असें नाहीं तर तें आपल्या सर्व संचिताचें, धैर्याचें, सहानुभूतीचें व सुजाणपणाचेंहि असतें." हें मानवी जीवनाचें एक तत्त्व स्वतः जॉन डी. रॉकफेलर यानें सांगून ठेवलें. तें तत्त्व त्यानें प्रत्यक्ष आचरलें आणि विश्वकल्याणासाठीं त्यानें तनमनधन अर्पण करून मानव-तेच्या इतिहासांत एक महान् आदर्श नोंदून ठेवला.

## जॉन डी. रॉकफेलर

अमेरिकेंतील क्लीव्हलँड नांवाच्या विकसनशील शहरांत युक्लिड अॅव्हेन्यू भागांतील वैभवशाली घरांत थोरल्या रॉकफेलर कुटुंबांत जॉनचा जन्म झाला– तो दिवस २९ जानेवारी १८७४.

रॉकफेलर कुटुंबाच्या संसाराचें सार्थक करणारा जॉन दोन वर्षांचा झाला त्या वेळीं या कुटुंबाचें वास्तव्य न्यूयॉर्क

शहरांत होतें, कारण पुत्रजन्मानंतर थोरल्या रॉकफेलरच्या अफाट कार्याचें क्षेत्र खूपच विस्तार पावलें. त्याच्या कर्तृत्वाचें यश आणि महत्त्व वाढतच गेलें.

थोरल्या रॉकफेलरचे इमारती लांकूड, खाणी, पोलाद, कागद, जमीनसुधारणा, जंगलकामें आणि अनेक प्रकारचे कारखाने इत्यादि विविध उद्योगांचें जाळें देशभर पसरलें, त्याच्या सर्वच व्यावसायिक जबाबदाऱ्या वाढल्या आणि बाळाच्या पायगुणाचा प्रभाव प्रत्ययास आला. त्यामुळें क्लीव्हलँडमधून रॉकफेलर कुटुंब न्यूयॉर्क शहरांत वास्तव्यास आलें.

जॉनचे आईवडील, आजी, मावशी आणि बहिणी ही सर्वच मंडळी धार्मिक प्रवृत्तीची असल्यामुळें जॉनच्या मनावर सद्धर्मभावनांचे सुसंस्कार बाळपणापासूनच घडत गेले. घरांत जी कोणी पाहुणेमंडळी येत तीहि बहुधा धर्म आणि सत्कार्यें यांविषयीं चर्चा करणारी असत. त्यामुळें तें घर म्हणजे सत्प्रवृत्तींचें एक आगरच बनलें.

प्रत्येक बाबींतील तपशील नजरेखालीं घालून अत्यंत काटकसरीनें दैनंदिन व्यवहार करण्याचें बाळकडू जॉनला वडिलांपासून मिळालें होतें. एक पेनीहि विनाकारण खर्च करण्याची त्याला संवय नव्हती. बाळपणापासूनच कमाईचा हिशेब स्वतःच्या डायरींत तो ठेवीत असे. त्यांतील एक उतारा पहा.

| | |
|---|---|
| फुटकें भांडें दुरुस्त करणें– | १ डॉलर |
| फौंटन पेन दुरुस्त करणें– | २५ सेंटस |
| तारदुरुस्ती – | १० सेंटस |
| गालिचा आंथरणें – | १० सेंटस |
| पेन्सिली तासणें – | २ सेंटस |
| थर्मामीटर लावणें – | १० सेंटस |

अशा रीतीनें जॉनच्या स्वावलंबी जीवनाची घडण घडली.

जॉनचें प्राथमिक शिक्षण घरींच झालें. वयाच्या दहाव्या वर्षी – १८८४ मध्यें – त्याला शाळेंत घातलें. शाळेंत त्याला सुसूत्र अभ्यासाची शिस्त लागली. तो जात्याच भारी बुद्धिमान् होता. निरनिराळ्या थोर दर्जाच्या शाळांतून शिकण्याची संधीहि त्याला मिळाली. प्रत्येक विषयांत शेंकडा ९५ पेक्षां कमी गुण त्यानें कधीं मिळविलेच नाहींत.

पण खूप अभ्यासाच्या ताणामुळें पुढें त्याच्या प्रकृतीवर परिणाम झाला. तेव्हां फॉरेस्टहिलवरील आरामघरांत एक वर्ष त्याला निवास करावा लागला. तरी पण त्याहि काळांत तेथील मोठ्या जंगल इस्टेटीची व्यवस्था पाहून नोंदी व हिशोब ठेवण्याची जबाबदारी त्याला सांभाळावीच लागली.

फॉरेस्टलहिल निवासांत जॉननें ‘ मेपल सायरप ’ बनविण्याचा खास उद्योग व्यवस्थित सांभाळला. स्वतःची

प्रकृति दुरुस्त केली आणि अनेक कष्टमय कामें करून मोठ-मोठ्या व्यवहारांचा मौल्यवान अनुभवहि गांठीला बांधला.

श्रीमंताचा मुलगा म्हणून ऐषआरामाचें ऐदी जिणें जगणें त्याला मुळींच पसंत नव्हतें. सतत कार्यरत राहण्याची शिकवण त्याच्या अंगीं बाणली होती. घरचीं व स्वतःचीं सर्व कामें करणें, घोड्यांची खरेदी, तबेल्यांची व्यवस्था, कुटुंब-सहलीसाठीं योजना व व्यवस्था या कामांचे चोख हिशेब व नोंद तो ठेवीत असे.

जॉनच्या बाळपणापासूनच्या नोंद ठेवलेल्या शेंकडों डायऱ्या आणि जुनाट, मळलेल्या, फाटक्या नोंदवह्या, हिशोबाच्या चोपड्या जशा उपलब्ध आहेत तशाच त्याच्या शाळेंतीलहि कांहीं वह्या मिळाल्या आहेत.

त्याच्या एका निबंधवहींत त्यानें—मुद्रणकला, निग्रोची कहाणी, स्लीपी हॉलोमधील शाळा अशा विषयांवर निबंध लिहिलेले उपलब्ध आहेत.

"केल्यानें देशाटन...मनुजा चातुर्य येतसे फार"... हें तत्त्व रॉकफेलर कुटुंबाला पूर्णपणें पटलेलें होतें. त्या दृष्टीनें तें कुटुंब सतत सहली-सफरी काढीत असे. आणि त्या सर्व सहली-सफरींची जबाबदारीची हिशेबाची व्यवस्था छोटा जॉन आवडीनें पहात असे.

इ. सन १८८७ मध्यें रॉकफेलर कुटुंब प्रथमच युरोपच्या सफरीवर गेलें होतें. त्या वेळीं जॉनच्या डायरींत सर्व

हिशोबांच्या व्यवस्थित नोंदी केलेल्या आढळल्या आहेत. खर्च, माहिती, सुंदर वर्णन, तपशील, योजना व परिणाम यांच्या अचूक नोंदीची संवय जॉनला जी बाळपणीं जडली ती त्याच्या भावी थोर आयुष्यांत फारच उपयोगी पडली.

## नवजीवनांत पदार्पण

१८९३ मध्यें ब्राऊन विद्यापीठांत जॉनचा प्रवेश झाला. कॉलेज म्हणजे नवयुवकांचें खेळकर स्वच्छंदी वातावरण. तेथें हा लाजाळू गंभीर विद्यार्थी तितकासा समरस होऊं शकला नाहीं. पण पुढें लौकरच त्याच्या हुशारीमुळें, सज्जनपणामुळें आणि सत्प्रवृत्तीमुळें त्याला तेथें मान मिळूं लागला. तो सर्वांचा आवडता मित्र बनला.

ज्यूनियर वर्गाचा अध्यक्ष, समारंभांचा कुशल नेता, नाटयसंमेलनांत उत्कृष्ट कार्यकर्ता आणि पायचेंडू (फूट-बॉल) संघाचा व्यवस्थापक वगैरे जबाबदारीच्या व मानाच्या जागांवर त्याची निवड झाली. अंगिकारलेलीं सर्वच कामें यथायोग्य रीतीनें पार पाडण्यांत जॉनचा हातखंडा होता. कॉलेजच्या सर्वच सहली-सफरींचें नेतृत्वहि त्यानें विशेष आवडीनें पार पाडलें. मजेबरोबरच मनाची समृद्धि होणें, मानवी जीवनाला सुसंस्कृतता येणें, रिकामपणाचा वेळ या कामीं सत्कारणीं लागणें, आणि संपत्तीचा सदुपयोग करणें, हे फायदे सहली-सफरींमुळें लाभतात हीं त्याची धारणा होती. सृष्टिसौंदर्याच्या

निरीक्षणानें, जगाच्या गरजा जवळून जाणल्यानें आणि विविध अनुभवांनीं थोर मानवी जीवनाची जोपासना केल्यानें जॉनच्या ह्या नवजीवनांत विशिष्ट उच्च ध्येयें सहजच रुजलीं गेलीं.

पदवी घेतल्यानंतर जॉनचें कॉलेज सुटलें. तो २६ ब्रॉड-वेच्या आपल्या वडिलांच्या कार्यालयांत कामाला लागला. त्यानंतर कांहीं वर्षांनीं त्याचा विवाह झाला. आणि विवाहानंतर जॉनच्या स्वभावांत अधिक स्वास्थ्य आणि व्यवस्थितपणा आला. त्याच्या नीटनेटकेपणाच्या संवयी, बिनचूक हिशेबनोंदीच्या पद्धति आणि अवाढव्य व्यवहार जबाबदारीनें पेलण्याची विलक्षण हातोटी यामुळें त्याचा कचेरीच्या कामांचा उरक वाढला, तो वडिलांच्या विश्वासाला सुपात्र ठरला आणि सर्वत्र आदर व प्रतिष्ठा त्याला लाभूं लागली.

आर्थिक व्यवहारांत कांटेकोरपणें वागण्यांत निष्णात असणाऱ्या थोरल्या रॉकफेलरचें कर्तृत्वशाली अनुभवी मार्गदर्शन जॉनला लाभलें होतेंच. परंतु त्यांच्या विश्वासु कारभारी म्हणून काम करणाऱ्या फ्रेडरिक टी. गेट्स या ध्येयवादी व्यवस्थापकाच्या विशेष मार्गदर्शनाचा लाभ जॉनला फारच उपयुक्त ठरला. गेट्स हा त्याच्या जीवनांत विशेष प्रेरक झालेला आहे. त्याच्याच सल्ल्यानें जॉन रॉकफेलरनें आपल्या वडिलांच्या अफाट संपत्तीचा आणि

प्रचंड प्राप्तीचा विनियोग विश्वकल्याणार्थ आणि मानवतेच्या सेवेप्रीत्यर्थ केला.

हजार वाटांनीं येणाऱ्या रॉकफेलरच्या प्रचंड संपत्तीचा विनियोग जगांतील मानवजातीच्या कल्याणासाठीं कसा करावा याची योजना गेट्स आणि जॉन या जोडीनें ठरविली. अतिप्रचंड दाननिधींच्या भक्कम पायावर चिरंतन टिकणाऱ्या सहकारी दानसंस्था स्थापून विश्वकल्याणाचें ध्येय साकार करण्यासाठीं त्यांनीं अनेक योजना कार्यान्वित केल्या.

## प्रचंड दानयोजना

रॉकफेलरनें जगभर प्रवास केला. दीनदलितांचीं दुःखें जाणून घेतलीं. अनेक रोगग्रस्तांची व्याधि समक्ष पाहिली. बहुविध कलासौंदर्याचीं विशाल दृश्यें अवलोकिलीं. आणि शेंकडों सांस्कृतिक केंद्रांना भेटी देऊन जीर्ण वास्तूंची दुर्दशा उघड्या डोळ्यांनीं पाहिली. तेव्हां त्याला असें आढळून आलें कीं--

"सर्व अनर्थांचें, दुःखाचें, व्याधीचें मूळ म्हणजे अज्ञान, दारिद्र्य व रोगराई हेंच आहे. जगांतील अज्ञान नाहींसें करण्यासाठीं, दारिद्र्य दूर करण्यासाठीं आणि रोगराई नष्ट करण्यासाठीं आपण तनमनधन अर्पण केलें पाहिजे. परमेश्वरानें निर्माण केलेलें हें विराट विश्व महन्मंगल सौंदर्यानें शक्य तितकें नटविलें पाहिजे. आणि मानवाच्या

सेवेसाठीं आपल्या बुद्धिचातुर्याचा, गुणांचा आणि अफाट संपत्तीचा उपयोग केला पाहिजे."

रॉकफेलरच्या या प्रचंड दानयोजनांना पित्यानें संमति दिली. गेट्सनें त्याला चालना दिली. अमेरिकेच्या या थोर दानशूर कुबेरपुत्रानें जगांतील रोगपरिहारासाठीं, ज्ञान-संशोधनासाठीं, दीनदलितांच्या उद्धारासाठीं, संस्कृति-संवर्धन आणि कलासौंदर्याच्या विकासासाठीं आपल्या अफाट संपत्तिसागराच्या अमृत तुषारांचा वर्षाव अविरत केला. जगांतील बहुविध आवश्यक कार्यें, अनेक विकास-गरजा व मानवसेवेचे कल्याणकारी संघटित प्रयत्न यांना रॉकफेलर या उदार दात्यानें सक्रिय साह्य केलें आहे.

कोटयवधि डॉलर्स खर्चून रॉकफेलरनें ज्या अनेक प्रचंड दानसंस्था स्थापल्या. त्यांपैकीं प्रमुख म्हणजे—

१ जनरल एज्युकेशन बोर्ड, २ रॉकफेलर इन्स्टिटयूट फॉर मेडिकल रीचर्स, ३ रॉकफेलर फौंडेशन व ४ लॉरा स्पेलमन रॉकफेलर मेमोरिअल संस्था.

या जगड्व्याळ व्यापाच्या शैक्षणिक, आरोग्यविषयक, संशोधनात्मक संस्थांखेरीज शेंकडों दानयोजना व प्रचंड सेवाकार्यें त्यानें करून ठेवलीं.

लोकहिताच्या तळमळीनें रॉकफेलरनें जागतिक परि-स्थितीचें पूर्णपणें निरीक्षण करून व प्रचंड दानयोजनेचे संघटित प्रयत्न संस्थापून पुढील कार्यें केलीं :—

वंश, लिंग, धर्म निरपेक्ष शिक्षणप्रसार. उच्च शिक्षणाचें वितरण आणि सर्वत्र शिक्षण-संशोधन केंद्रें स्थापन करणें.

कॅन्सर, मलेरिया, पिवळा ताप इत्यादि रोगांचें निवारण करणें व जागतिक वैद्यकसंशोधन करून जगांतील दुःखें दूर करणें.

शेतीसंशोधन व शास्त्रोक्त शेतीप्रसार करून जोडधंद्यांनीं खेड्यांतील जीवन सुखी, संपन्न, उन्नत व स्वावलंबी करणें.

बुद्धिवादी सुधारणांनीं नागरनीतीचें पूर्ण संगोपन करणें. नागरिकांचीं मनें सुसंस्कृत करून विविध कलाभिवृद्धि व संस्कृतिप्रसार करणें व विख्यात सौंदर्यस्थळांचें दर्शन घडविणें.

नीग्रोंची सुधारणा करणें, वर्गकलह मिटविणें, जुन्या सांस्कृतिक वस्तूंचा जीर्णोद्धार करणें.

रॉकफेलरच्या या बहुविध कार्यावरून त्याच्या निष्ठेची सहज कल्पना येईल.

रॉकफेलरनें दिलेल्या मोठमोठ्या देणग्यांमुळें त्याला जें समाधान लाभलें त्यापेक्षांहि जास्त समाधान त्यानें दिलेल्या वैयक्तिक छोट्या लाखों देणग्यांमुळें त्याला लाभलें. सर्वांच्या सर्वसंकटाचा परिहार करणारा रॉकफेलर हा जगांतील एक थोर मानव होता.

## ज्ञानदान

थोरल्या रॉकफेलरनें शिकागो विद्यापीठ स्थापन करून इतर अनेक शिक्षणसंस्थांना द्रव्यसाहाय्य दिलें होतें. दक्षिणेंतील नीग्रोंच्या शिक्षणासाठीं त्यानें अत्यंत परिश्रम घेतले होते. जॉन रॉकफेलरनें पित्याच्या या शैक्षणिक कार्यांना जोराची चालना देऊन त्यांचा खूप विकास केला. त्याखेरीज जनरल एज्युकेशन बोर्ड आणि इंटरनॅशनल एज्युकेशन बोर्ड या संस्थांच्या जगड्व्याळ कारभाराचा व्याप आपल्या प्रचंड दानयोजनांच्या साह्यानें त्यानें सांभाळला.

शेंकडों विद्यापीठें, शिक्षण संस्था आणि संशोधन-केंद्रें यांच्यासाठीं सोयिस्कर इमारती, आवश्यक ती साधनसामुग्री आणि शैक्षणिक व शास्त्रीय शोधांचीं प्रात्यक्षिकें, प्रदर्शनें इ. सोयी उपलब्ध करून देण्याचें महान् कार्य रॉकफेलरनें केलें.

शेंकडों अभ्यासकांना आणि विद्यार्थ्यांना अनुदान देणें, मुलींच्या शिक्षणासाठीं विशेष प्रयत्न करून जागतिक प्रोत्साहन देणें आणि नीग्रोंच्या विकास-कल्याणासाठीं सक्रिय साहाय्य करणें हीं कामें त्याच्या फारच आवडीचीं होतीं.

अमेरिकेंत असणाऱ्या हॅम्प्टन इन्स्टिटयूट, युनायटेड, नीग्रो कॉलेज फंड, ब्राउन युनिव्हर्सिटी, बर्नार्ड व डार्टमथ

कॉलेजें अशा अनेक शिक्षणसंस्थांना त्यानें जशी कोटयवधि डॉलर्सची देणगी दिली तशीच जगांतील इतर देशांतील खूप शिक्षणसंस्थांना देणग्या पाठवून जगभर ज्ञानप्रसार करण्याचें श्रेय त्यानें संपादन केलें.

रॉकफेलरनें शेंकडों शिक्षणसंस्थांना, सांस्कृतिक चळवळींना आणि ज्ञानप्रसारात्मक कार्यांना "रॉकफेलर फौंडेशन" या जगप्रसिद्ध दानसंस्थेच्या अंतर्गत व तिच्या कार्यकक्षेबाहेर व्यक्तिशः अतिभव्य देणग्यांचें दान देऊन आपल्या घराण्याचें व देशाचें नांव आजरामर करून ठेवलें आहे.

या कार्याचा व्याप खरोखरीच अति प्रचंड आहे. रॉकफेलरकडून दान मिळालेल्या संस्थांची ही नुसती यादीच केवढी मोठी आहे.

जर्मनींतील हायड्ल विद्यापीठ, स्वित्सर्लंडमधील जिनेव्हा विद्यापीठ, बेल्जियमचें लोवेन व चीनचें लिग्नान विद्यापीठ, कैरोमधील अमेरिकन विद्यापीठ, कॅनडांतील अकेडिया विद्यापीठ आणि निअर ईस्ट कॉलेज असोसिएशनमध्यें समाविष्ट असलेल्या शिक्षणसंस्था, इस्तंबूल, बैरुत, अथेन्स, सोफाया येथील स्त्रिया व पुरुष यांच्यासाठीं काढलेल्या स्वतंत्र कॉलेजसंस्था, वैद्यकशाळा इ. इ.

ज्ञानप्रसाराच्या कामीं जगांतील ग्रंथालयांचाहि विकास करण्यासाठीं रॉकफेलरनें दानें दिलीं. जिनिव्हा येथील राष्ट्रसंघाचें ग्रंथालय, न्यूयॉर्क पब्लिक लायब्ररी, लायब्ररी ऑफ अमेरिकन काँग्रेस आणि टोकियोमधील जपानच्या इंपीरियल युनिव्हर्सिटीचें ग्रंथालय इत्यादिकांना त्यानें भव्य देणग्या देऊन जगांत बंधुभाव वाढविला.

## आरोग्यदान

पूर्वी महाभारतांतील एका यक्षाच्या प्रश्नांना धर्मराजानें सयुक्तिक उत्तरें देऊन आपल्या मृत बांधवांची सुटका करून घेतल्याचें सुप्रसिद्धच आहे. त्या यक्षप्रश्नांत सर्वांत मोठें धन 'विद्या' आहे आणि सर्वांत मोठा लाभ 'आरोग्य' आहे असें सांगितलें आहे. विद्या व आरोग्य यांचा सुंदर मेळ प्रत्यक्षांत उतरवून दाखविणारा आणि आपल्या अगणित धनाच्या दानानें जगाला विद्येचा आणि आरोग्याचा सर्वांत मोठा लाभ करून देणारा आधुनिक धर्मराज म्हणजे रॉकफेलर हा होय.

"दातृत्वाच्या आधुनिक कल्पना-योजनांत ज्ञानंवृद्धी-बरोबरच आरोग्यवृद्धि सर्वश्रेष्ठ आहे," हें रॉकफेलरनें जाणलें होतें. मानवाविषयींच्या सहानुभूतीनें व तळमळीनें त्यानें जगाला आरोग्यज्ञान देण्यास कष्ट घेतले. अनेक दुःसाध्य रोगांचा पिच्छा पुरवून सतत चिकाटीनें आणि

कोटयवधि डॉलर्स ओतून, त्यावरील उपचार त्यानें सर्वांना सहज सुलभ केले.

एके दिवशीं रॉकफेलरच्या मेजावर अचानक एक पत्र येऊन पडलें. ब्रुकलिनमधील डब्ल्यू. जे. कर्न्स या नांवाच्या पोस्टमनचें तें पत्र होतें. त्याच्या मुलीला डायबेटिस (मधुमेह) झाला होता. त्यावर 'इन्शुलिन' नांवाचें औषध त्यानें महान् प्रयत्न करून मिळविलें होतें. त्या पोस्टमननें पत्रांत रॉकफेलरला विनंती केली होती कीं–

"जगांतील बहुसंख्य मधुमेही लोकांना इन्शुलिन हें दुर्मिळ औषध सहजपणें प्राप्त होण्यासाठीं आपण दयाळूपणें या औषधाचें दान जगभर करावें."

या पत्रामुळें रॉकफेलरचें अंतःकरण द्रवलें. लगेच त्यानें पंधरा लक्ष डॉलरांची देणगी देऊन रॉकफेलर इन्स्टिटयूट-मार्फत जगभर इन्शुलिनच्या संशोधनास व त्याच्या सहज-प्राप्तीच्या व्यवस्थेस जोराची चालना दिली.

रॉकफेलरची कॉलेज-मैत्रीण बेसी डॅसैल हिला हाताच्या दुखापतींत एकदां कॅन्सरची बाधा झाली. कॅन्सरमुळें तिचा तो हात तोडावा लागला. नंतर ती त्या कॅन्सरमुळेंच पुढें मरण पावली.

या दुःखद वार्तेनें रॉकफेलरला धक्का बसला. तेव्हां-पासून कॅन्सरवरील संशोधन आणि उपाययोजना

करण्याकडे रॉकफेलरनें सतत लक्ष दिलें. न्यूयॉर्कच्या कॅन्सर हॉस्पिटलला त्यानें दरसाल लाखों डॉलर्सच्या निनांवी देणग्या दिल्या. डॉ. एविंग यांनीं कॅन्सरच्या संशोधनासाठीं खूप प्रयत्न केले. त्यांना रॉकफेलरनें तीस लाख डॉलर्सचें दान दिलें.

कॅन्सरवरील उपचारांत रेडियम चांगला उपयोगी पडतो म्हणून मादाम क्यूरीच्या कार्यास त्यानें साहाय्य केलें.

पिवळा ताप या रोगावर उपचार शोधून काढण्यासाठीं त्यानें चालना दिली. रॉकफेलर सॅनिटरी कमिशननें नारूचा प्रसार नष्ट करून त्यावर इलाज काढले. रॉकफेलर फौंडेशनच्या इंटरनॅशनल हेल्थ बोर्डानें मलेरियाचें समूळ उच्चाटन करण्याची मोहीम जगभर मोठ्या नेटानें चालवून यशस्वी केली, हार्पकिन्स विद्यापीठाला रॉकफेलरनें देणग्या देऊन आधुनिक संशोधन, अद्ययावत् सामुग्री, ज्ञान आणि अनुभव इत्यादि आरोग्यविषयक बाबींना सक्रिय साह्य केलें.

रोगतज्ज्ञांच्या तुकड्या जगभर पाठवून रोगांचें संशोधन, रोगनिवारक उपचार, वैद्यकाच्या साधनांचा फैलाव आरोग्यविद्यालयें, दवाखाने–केंद्रें वगैरेंना कायम स्वरूपाच्या भव्य देणग्या दऊन रॉकफेलरनें जगांतील रोगपीडितांना दिलासा दिला.

## न्यायदान

दक्षिण कोलोराडोमधील कोळसाखाणींतील वीस कामगार आणि अधिकारीवर्ग यांच्यांत भयंकर संघर्ष होऊन कामगारांनीं संप पुकारला. सतत पंधरा महिने हा झगडा चालला. सर्वत्र हिंसा, अत्याचार, दुःख आणि असंतोष माजला. त्यामुळें राष्ट्राला धक्का बसला. उत्पादन थंड पडलें.

खाणींच्या शेअर भांडवलवाल्यांत सर्वांत मोठा श्रीमंत भांडवलदार जॉन रॉकफेलर हा होता. त्याच्या कानांवर ती संपाची दुःखद वार्ता गेली. पण त्याला खरी परिस्थिति मात्र लौकर कळलीच नव्हती. कारण–निर्दय व्यवस्थापकांच्या कारवायांमुळें व त्यांनीं धरलेल्या आत्मविजयाच्या फाजील विश्वासामुळें त्यांच्या अहवालांत सत्य परिस्थिति सततच दडवून ठेवलेली असे. त्यामुळें गुन्हेगार मजूर कामगारांच्या अविचारी वर्तनाला आळा घालण्यासाठीं संप दडपून टाकण्यासाठीं रॉकफेलरनें आपल्याच अधिकाऱ्यांची बाजू उचलून धरली.

त्यामुळें रॉकफेलर म्हणजे एक निर्दय, अन्यायी, हृदयशून्य उद्योगपति, कामगारांच्या हक्काविषयीं उदासीन असा नफेखोर भांडवलदार असा साऱ्या कामगारजगांत त्याचा दुर्लौकिक पसरला.

परिस्थिति चिघळली व शेवटीं सरकारला तेथें लष्करी हस्तक्षेप करावा लागला. रॉकफेलरच्या विरुद्ध सर्वत्र निदर्शनें घडूं लागलीं. त्या हलकल्लोळामुळें जॉनचें अंत-करण द्रवलें. जनतेपासून आपण दुरावल्याची जाणीव त्याला झाली.

मालकांनीं मजुरांशीं स्नेहसंबंध प्रस्थापित केले तरच ही आग शमणार आहे याची जाणीव त्याला होतीच. तथापि कामगारांच्या या भयंकर उठावाचें कारण आणि त्यांच्या दुःखाचें मूळ शोधून काढलेंच पाहिजे आणि त्यांना न्याय दिलाच पाहिजे असें त्यानें ठरविलें. ही बिकट कामगिरी रॉकफेलरनें आपल्या मॅकेंझी किंग नांवाच्या विश्वासू व तज्ज्ञ अशा मित्रावर सोंपविली.

मॅकेंझी किंगनें समक्ष जाऊन एकंदर परिस्थिति अव-लोकन केली. खाणीचे प्रमुख व्यवस्थापक बावर्स याला बडतर्फ करून टाकलें. सलोख्यानें संप मिटविला आणि लौकरच तेथें पूर्ववत् शांतता निर्माण झाली.

२० सप्टेंबर १९१५ रोजीं रॉकफेलर कोलोराडो येथें समक्ष गेला. तो कोलोराडोच्या परिसरांत स्वतः फिरला. त्यानें सत्य परिस्थितीचें ज्ञान करून घेतलें. तो घरांघरांतून हिंडला. कामगारांच्या कुटुंबियांना व्यक्तिशः भेटला. त्यांच्याशीं समरस होऊन त्यानें गप्पागोष्टी केल्या.

शाळांना भेटी देऊन त्यानें कामगारांच्या मुलांशीं हितगुज केलें. मजुरांच्या यातना जागल्या व अनेकांशीं त्यानें मन-मोकळेपणानें विचारविनिमय केला.

रात्रीं-बेरात्रीं तो एकटाच मुद्दाम तेथें फिरला. पण त्याला कुणापासून कसला दगाफटका झाला नाहीं. उलट हे गरीब लोकहि किती थोर अंतःकरणाचे आहेत, याचा त्याला प्रत्यक्ष अनुभव आला.

नंतर एका जाहीर सभेंत त्यानें मालक-मजूरांची नवी संयुक्त योजना सर्वांना पटवून दिली. खाण-उद्योगांत मजुरांना भरपूर प्रतिनिधित्व दिलें. अन्यायाविरुद्ध संरक्षण देणारें न्यायदान मंडळ स्थापलें. कामगार मजूरांच्या संघट-नेला मान्यता देऊन अनेक सुखसोयी व सवलती वाढविल्या. वेतनश्रेणीमधील भेदभाव नाहींसा करून सर्वांना सुखी केलें, आणि अशा प्रकारें खरें न्यायदान देऊन सलोखा वाढविला.

## पुराण वास्तूंचा जीर्णोद्धार

रॉकफेलरला प्रवासाचा मोठा छंद होता. तो ज्या ज्या स्थळीं गेला त्या त्या स्थळीं त्यानें आदरानें कलापूर्ण वास्तूंचें सूक्ष्म निरीक्षण केलें.

कालचक्राचे फेरे, युद्धें आणि उपेक्षा यामुळें जुन्या काळच्या इमारती, किल्ले, राजवाडे, प्रार्थनामंदिरें वगैरेंची

झालेली पडझड, दुर्दशा आणि अवहेलना पाहून तो फार व्यथित झाला. त्या सर्व सांस्कृतिक ठेवींचें जतन करून व लाखों डॉलर्स खर्च करून त्यानें कांहीं वास्तूंचे जीर्णोद्धार घडविले.

रॉकफेलरनें केलेल्या जगांतील अनेक जीर्णोद्धारांच्या कार्यांपैकीं एक संस्मरणीय व दर्शनीय असा जीर्णोद्धार म्हणजे अमेरिकेच्या व्हर्जिनियांतील सुप्रसिद्ध विल्यम्सबर्ग या वसाहत वास्तूचा जीर्णोद्धार होय. या ठिकाणीं अठराव्या शतकांतील वसाहतीचें यथार्थ स्मारकच उभें केलेलें आहे. त्या भूतकाळाच्या भव्य ऐतिहासिक वातावरणांत प्रत्यक्षतः रमून जाण्याचें भाग्य आजच्या पिढींतील कोटयवधि अमेरिकन लोकांना लाभत आहे. इ. स. १७१५ मध्यें ही वसाहत उभारली गेली होती. सुमारें दोनशें वर्षांच्या पडझडीनंतर १९०७ मध्यें तिचा जीर्णोद्धार झाला होता. पण नव्या डागडुजीमुळें मूळच्या वास्तुसौंदर्याला विकृति प्राप्त झाली होती.

१९२४ सालीं जॉन रॉकफेलरनें ती गोष्ट मनावर घेऊन समक्ष सर्व योजना पाहून व ठरवून प्रत्यक्ष कार्य सुरू केलें. 'डेव्हिड्स् फादर' या टोपणनांवानें त्यानें त्या कामासाठीं अमाप रकमा दान दिल्या.

डॉ. गुडविन नांवाच्या गृहस्थानें आपला तज्ज्ञ इतिहास-संशोधक मित्र पेरी याच्या साह्यानें अनंत अडचणींवर मात करून विल्यम्सबर्गच्या सर्व ऐतिहासिक वास्तू पुन्हां मूर्तिमंत उभ्या केल्या. रॉकफेलरच्या दानसाह्याच्या पाठ-बळावर जगांतील एक भव्य आश्चर्यच त्या जागीं अवतीर्ण केलें.

१९५१ मध्यें हें जीर्णोद्धाराचें कार्य पूर्ण झालें. पुरातन स्थापत्य कौशल्याचा ठेवा जपणारा श्रीमंत जॉन डी. रॉक-फेलर हा देशाच्या आदरास पात्र ठरला यांत नवल तें काय?

विल्यम्सबर्गच्या जीर्णोद्धाराप्रमाणेंच रॉकफेलरनें जगां-तील अनेक ठिकाणच्या जीर्णोद्धारासाठीं अनाहूतपणें कोटयवधि डॉलर्सचें दान दिलें. उदाहरणार्थ–

फ्रान्समधील व्हर्साय राजवाड्याचा जीर्णोद्धार, फांतेन-ब्लोचा जंगलराजवाडा आणि वनउद्यानें, ऱ्हीम्स येथील कॅथिड्रलचा अतिभव्य जीर्णोद्धार. चीनमधील पेकिंगच्या कांहीं कलावास्तूंचा जीर्णोद्धार. अशा रीतीनें त्यानें जीर्ण पुराणवास्तूंच्या अतिभव्य भग्नावशेषांकडे विशिष्ट दृष्टि-कोनांतून पाहिलें. आणि त्या इतिहासाचें पुनर्दर्शन सर्वांना सुलभ करण्यासाठीं त्यानें आपली बुद्धि, चातुर्य, श्रम, वेळ आणि पैसा मुक्तहस्तानें खर्च केला.

**निसर्गरक्षणाचा प्रचंड हव्यास**

"पुराणवास्तूंचें वास्तववादी वैभव जोपासण्याप्रमाणें कांहीं सृष्टीचाहि भाग मूळच्या नैसर्गिक स्वरूपांतच कायम ठेवला पाहिजे, तो जोपासला पाहिजे आणि विशेष कलापूर्णतेनें त्याचें सौंदर्यहि वाढविलें पाहिजे" या गोष्टीची जॉन रॉकफेलरला विशेष आवड होती.

त्या दृष्टीनें आपल्या आयुष्यांत कांहीं अविस्मरणीय कार्यें त्यानें करून दाखविलीं आहेत.

अकेडिया नॅशनल पार्क, जॅक्सन होल (खोरें), पालिसेडस इंटरस्टेट पार्क, कॅलिफोर्नियांतील सेकोयाज आणि येझेमाइट नॅशनल पार्कमधील शुगरपाइन्स इ. भागांचें संगोपन, संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठीं त्यानें आटोकाट प्रयत्न केले, कोटयवधि डॉलर्स दान दिले आणि या कार्यासाठीं तळमळीनें कष्ट केले.

माउंट डेजर्ट हायलंडच्या सहलींत तेथील अफाट रम्य नैसर्गिक सौंदर्यानें रॉकफेलरला एकदां मोहित केलें. ग्रॅनाइट पर्वतश्रेणी, सुंदर समुद्रकिनारा, विपुल जलाशय, उंचउंच खडक, वन्य वृक्षलतांची आणि फुलपाखरांची विविधता नैसर्गिक, शुद्ध, शांतनिवांत जागा त्याला मनापासून आवडली.

प्रथम त्यानें अनेक अडचणींना तोंड देऊन तो सर्वच भूभाग खरेदी केला व तो सरकारच्या ताब्यांत देऊन राष्ट्रीय उद्यानाची योजना प्रत्यक्षांत आणण्याचें महाकार्य केलें. तेथील सोयीसाठीं इमारती, रस्ते, बागबगीचे, उपवनें, पशुपक्ष्यांचें संरक्षण-संवर्धन वगैरेसाठीं त्यानें अमाप पैसा खर्च केला. हाच अकेडिया नॅशनल पार्क.

पश्चिमेच्या यलोस्टोन पार्कमध्यें एकदां जॉन आपल्या कुटुंबियांसह विहार करीत असतां त्या पार्कच्या पार्श्वभागीं असलेल्या ग्रॅंडटेटन पर्वतराजीचा भव्यसुंदर देखावा त्याच्या पाहण्यांत आला. टेटन पर्वताच्या अग्रभागीं जॅक्सन नदीच्या खोऱ्याचा रमणीय भूभाग त्यानें जंगल-संरक्षित भाग म्हणून करण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें त्या स्थळीं शेंकडों बर्फमय जलाशय, सेज नांवाच्या वनस्पतींनीं आच्छादलेलीं माळरानें, महाकाय पर्वत, नद्या, ओढे, झरे, धबधबे इत्यादींनीं समृद्ध अशीं रम्यस्थळें, वनराया आणि जंगली प्राण्यांच्या नैसर्गिक निवाससोयी वगैरे गोष्टी निर्माण केल्या.

त्या सृष्टिसौंदर्याचा आनंद लुटण्यासाठीं येणाऱ्या हजारों हौशी प्रवाश्यांच्या सर्व सुखसोयीहि तेथें रॉकफेलरच्या साहयानें उपलब्ध झालेल्या आहेत. या योजनेला जॅक्सन होल (खोरें) असें म्हणतात.

न्यूयॉर्क शहराच्या जवळच हडसन नदीच्या काठीं एका सुंदर पर्वताची प्रचंड भिंत उभी आहे. ती भिंत जशीच्या तशीच पूर्णपणें राखून ठेवून त्या प्रचंड शहराचा रमणीय पार्श्वभाग अत्यंत शोभिवंत करावा या विचारानें रॉकफेलरनें तेथील जमीन विकत घेऊन सरकारच्या स्वाधीन केली.

त्या भागांत सार्वजनिक उपयोगासाठीं एक सुंदर राष्ट्रीय उद्यान सरकारनें संयुक्त सहकार्यानें उभारलें आहे. त्या स्टेट पार्कची शोभा, उपयुक्तता आणि श्रेष्ठता वाढविण्यासाठीं जॉन रॉकफेलरनें अतुल दान दिलें आहे. या कामीं रॉकफेलरचा गौरव करतांना एका वृत्तपत्रानें लिहिलें आहे :

" रॉकफेलरच्या अनेक दानांपैकीं हें एक अत्यंत देखणें चिरंतन स्मारक आहे. गजबजलेल्या या थोर राजधानींतील आजउद्यांचे लोक या दानामुळें भव्य पहाडी प्रदेश आणि नदीखोरें सुरक्षित विहारक्षेत्र म्हणून राखल्याबद्दल रॉक-फेलरला दुवाच देतील. "

हाच तो पालिसेड्स इंटरस्टेट पार्

BVBK-0401238
BVBK-0401238

## तोचि आवडे देवाला !

रॉकफेलरनें जगांतील दैन्यदु:खांच्या मूळ कारणांवर आघात करण्यासाठीं आपल्या संपत्तीचा पूर वाहवला. मानवांचा आत्मा म्हणजेच परमेश्वराचें सत्स्वरूप होय, हें त्यानें जाणलें आणि त्याच ईश्वराची पूजा बांधिली. त्या पूजेचें कंकण बांधलेली संस्था जी रॉकफेलर फौंडेशन ती त्यानें स्थापन करून तिला व इतरहि कांहीं सेवासंस्थांना चिरंतन स्वरूप दिलें.

रॉकफेलरच्या प्रचंड दान-निधीवर चालणाऱ्या सर्वच संस्था भरभक्कम पायावर उभ्या आहेत. सार्वजनिक थोर प्रतिष्ठा त्यांना लाभलेली आहे आणि त्यांचें कार्य बहुमोल आहे.

रॉकफेलरनें बहुधा गुप्तदानेंच दिलीं. तो पुष्कळ वेळां नम्रपणानें म्हणे कीं–

"माझ्या मदतीचा स्वीकार हाच माझा मोठा सन्मान आहे." योग्य कार्याला अवश्य तें व जरूर तितकें साह्य करण्याची त्याची सततची वृत्ति कधींच थांबली नाहीं. नांवासाठीं तो कधींच हपापला नाहीं.

जॉननें ॲरिस्टॉटल आणि प्लेटो मोठ्या आवडीनें वाचले होते. तो त्यांचें सतत मनन चिंतन करीत असे.

"श्रमसेवेचें बांधुन कंकण,
त्रिभुवन सारें घेई जिंकुन।
अर्पुनि अपुलें हृद्‌सिंहासन,
नित भजतो मानवतेला
तोचि आवडे देवाला ...."

एका कवीच्या या प्रसिद्ध पद्यपंक्ति रॉकफेलरला तर उद्देशून नसाव्यात ना, असा भ्रम प्रत्येकास वाटणें अगदीं सहज आहे. इतकें लोकविलक्षण आदर्श चरित्र जॉन डी. रॉकफेलरचें आहे ! धन्य तो दानशूर कुबेर !

* * *

१२७९ दि. 20/4/79
बा-वा.

# कांहीं तरी नवेंच करा

जीवनाची ठराविक चाकोरी सोडून—'कांहीं तरी नवेंच' करण्याची ईर्षा बाळगली आणि तत्सिद्ध्यर्थ विशिष्ट जीवनक्षेत्रात अलौकिक कर्तृत्व केलें अशांची चरित्रें.

तीस मिनिटांत वाचून होणारीं पुस्तकें : शालेय-वर्गग्रंथालयासाठीं योजना

१. असा असतो देशभक्त : कोतवाल
२. गुलाम बंड करतो : स्पार्टकस
३. रा. शिक्षणाचा ध्यास : बिजापूरकर
४. कादंबरीकार हरीभाऊ : आपटे
५. मराठी नटसम्राट : गण. जोशी
६. व्यायाम भीष्माचार्य : माणिकराव
७. लष्करी संघटक : क. लॉरेन्स
८. अलौकिक शिल्पकार : एंजलो
९. चित्रपट महर्षि : दादासाहेब फाळके
१०. इतिहासाचार्य राजवाडे : राजवाडे
११. बंदीजनांची माउली : फ्राय
१२. देशासाठी दर्यापार : जेम्स कुक
१३. वीरबाला झोया : ( रशिया )
१४. बहादूर शिकारी : जिम कॉर्बेट
१५. कोई भी चीज उठाव : बुलबर्ग
१६. वीरपत्नी राणी दुर्गावती :
१७. विख्यात वकील : बॅ. जयकर
१८. विलक्षण वार्ताहर : अर्नेस्ट पाइल
१९. भारतीय चित्रकार : रविवर्मा
२०. मराठी मुद्रण-प्राणदाता : जावजी
२१. राजमाता जीजाबाई
२२. स्वदेशी कारखानदार : धंताजी काळे
२३. भव्य स्थापत्य : फर्डिनांड द लेसेप्स
२४. सर्कस बहाद्दर : विष्णुपंत छत्रे
२५. भक्तिवेडी बहिणा : बहिणाबाई
२६. सद्गुणी बनण्याची कला : फ्रँकलिन
२७. भारत-कवि टागोर : रवींद्रनाथ
२८. कोशकार केतकर : डॉ. केतकर
२९. कृषिपंडित : दादासाहेब डेबिकर
३०. सदा खेळाडू : पी. बाळू
३१. चिरंजीव मरण : मदनलाल धिंग्रा
३२. विमामहर्षि : अण्णासाहेब चिरमुले
३३. तेजस्वी धर्मोद्धारक : शंकराचार्य
३४. बंडखोर लोककवि : अनंत फंदी
३५. साकार संगीत : पं. पलुस्करबुवा
३६. साहसी वैमानिक : सँटा ड्युमा
३७. दरियाचा राजा : कान्होजी आंग्रे
३८. जमिनीचा जादूगार : डॉ. कार्व्हर
३९. लाखांचा प्राणदाता : लुई पाश्चर
४० शिक्षण-भगीरथ : भाऊराव पाटील
४१. मराठी-मुद्रक : गणपत कृष्णाजी
४२. बर्फातला माणूस : हिलरी
४३. प्राणावरचा प्रवास : शिफर्ड
४४. दानशूर कुबेर : रॉकफेलर
४५. प्रवासी पंडित : ह्युएनत्संग
४६. नृपनिर्माता : आर्य चाणक्य
४७. असामान्य क्रिकेटपटु : ब्रॅडमन
४८. लोकहिताचा संरक्षक : वि. पटेल
४९. पहिला मिशनरी : गजाननराव वैद्य
५०. तुम्हांला कोण व्हावेसें वाटतें ?

प्रत्येक पुस्तक पन्नास नये पैसे : संच पेटी रु. २५.

वोरा अँण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.